GOVERNMENT OF MAHARASHTRA

# "गौण पीके" या एतदर्थ पाहणीवरील अहवाल
## (डिसेंबर, १९९२ ते मार्च, १९९३)

# A report on adhoc survey on "Minor Crops"
## (December, 1992 to March, 1993)

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
DIRECTORATE OF ECONOMICS AND STATISTICS, GOVERNMENT OF MAHARASHTRA, MUMBAI

## प्रस्तावना

हा अहवाल डिसेंबर, १९९२ ते मार्च, १९९३ या कालावधीत "गौण पीक" या विषयासंबंधी गोळा करण्यात आलेल्या माहितीवर आधारित आहे. या पाहणीचा मुख्य उद्देश जिल्हा/राज्य उत्पन्नाचे अंदाज काढण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या गुणोत्तरामध्ये सुधारणा करणे असा होता. या अहवालात महाराष्ट्रातील ग्रामीण शेतकऱ्यांनी घेतलेल्या गौण पिकांच्या उत्पादनांचा तपशील या संबंधीची माहितीही देण्यात आली आहे.

मुंबई.
दिनांक :

भा.मा.नगराळे
अर्थ व सांख्यिकी संचालक,
मुंबई.

# PREFACE

This report is based on the information collected during December, 1992 to March, 1993 regarding "Minor Crops". The main aim of this survey was to improve the ratios used for district / state income estimates. The report also presents an assessment of the production of minor crops produced by the rural farmers.

Mumbai.
Date :

B.M.Nagrale
Director of Economics and Statistics,
Mumbai.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण/परीशिष्ट | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रकरण - १ पाहणीचा उद्देश व अंमलबजावणी | १ |
| २. | प्रकरण - २ पाहणीचे निष्कर्ष | ३ |
| ३. | प्रकरण - ३ पाहणीतील निष्कर्षांचा सारांश | ४२ |
| ४. | परीशिष्ट - १ अहवालाचा इंग्रजी गोषवारा | ४९ |
| ५. | परीशिष्ट - २ पाहणीसाठी वापरलेले पत्रक | ५१ |

# प्रकरण - १ पाहणीचा उद्देश व अंमलबजावणी

१.१ पाहणीचा उद्देश - नैसर्गिक अनुकुलतेनुसार शेतकरी वर्ग वेगवेगळ्या प्रकारची पिके घेत असतात. त्यामध्ये मुख्य पीक व गौण पीक यांचा समावेश होतो. काही काही वेळा उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून नगदी पीक घेतात त्याप्रमाणेच उत्पन्नाचे दुय्यम साधन म्हणून गौण पिकांचाही उपयोग होतो. तरीही सर्वसामान्यपणे प्राधान्यतः उत्पन्नाचे साधन म्हणून मुख्य पिकावरच लक्ष केंद्रीत होते तर दुय्यमरीत्या घेतली जाणारी गौण पिके उत्पन्नाचे साधन म्हणून लक्षात येत नाहीत. मुख्य पिकांबरोबरच किंवा स्वतंत्ररीत्या सदर दुय्यम स्वरुपाची म्हणून गणली गेलेली गौण पिके घेतली जातात त्या अर्थी ती शेतकरी वर्गाच्या आर्थिक व कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी पूरक ठरतात. गौण पिकांचे उत्पादन व उपउत्पादन आणि त्यासंबंधीच्या निविष्ठांचा अभ्यास करुन त्यानुसार त्या माहितीचा उपयोग राज्य/जिल्हा उत्पन्नाचे अंदाज सुधारण्यासाठी करता यावा या उद्देशाने सदर पाहणी करण्यात आली आहे.

१.२ पाहणीचे स्वरुप - जमिनीची प्रत, पर्जन्य व हवामान यांच्या अनुरुपतेनुसार विभागवार व त्याचप्रमाणे जिल्हावार विविध प्रकारची प्रमुख व गौण पिके घेण्यात येतात. सर्वच गौण पिकांची पाहणी करणे वस्तुतः विस्तृत स्वरुपाचे काम असल्याने जिल्हानिहाय गौण पिके विचारात घेऊन त्या त्या जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्षेत्र असलेली दोन गौण पिके पाहणीकरीता निवडलेली आहेत. गौण पिकांखालील क्षेत्रासंबंधीचा तपशील ऋतू व पिके या संबंधीच्या अहवालामधील माहितीच्या आधारे घेतलेला असून त्याद्वारे जिल्हावार गौण पिकांची यादी करुन त्यातील जास्तीत जास्त क्षेत्र असलेल्या दोन गौण पिकांची निवड पाहणीसाठी केलेली आहे.

१.३ निवड पद्धती - वरील परिच्छेद १.२ मधील उल्लेखानुसार जिल्हानिहाय दोन गौण पिकांची निश्चिती झाल्याने पाहणी घेण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील तालुके व गावे निवडण्याचे काम जिल्हा पातळीवर जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांच्याद्वारे करण्यात आले आहे. याकरीता जिल्ह्यातील संबंधित कृषि अधिकाऱ्यांशी चर्चा करुन निवडलेल्या गौण पिकाखाली जास्तीत जास्त क्षेत्र असलेले दोन तालुके निवडण्यात आले. निवडलेल्या पिकांखालील जास्तीत जास्त क्षेत्र वेगवेगळ्या तालुक्यात आढळलेल्या जिल्ह्यांकरीता दोन पेक्षा जास्त तालुक्यांची निवड करण्यात आलेली आहे. निवडलेल्या तालुक्यातील ज्या गावात निवडलेल्या गौण पिकाचे जास्तीत जास्त क्षेत्र असेल अशी पाच गावे निवडली आहेत. प्रत्येक जिल्ह्यातून सर्व मिळून १०० शेतकऱ्यांची माहिती गोळा करावयाची होती. तथापि कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातून काही अपरिहार्य कारणास्तव अनुक्रमे ८५ व ८३ शेतकरी निवडलेले असून लातूर जिल्ह्यात जास्तीत जास्त क्षेत्र असणारे दोन्ही गौण पिके घेणारे ५० शेतकरी मिळाल्याने तेथे १०० शेतकऱ्यांऐवजी ५० शेतकरी निवडलेले आहेत. असे एकूण २,८१८ शेतकरी पाहणीसाठी विचारात घेतले आहेत. सदर शेतकऱ्यांची निवड प्रत्येक निवडलेल्या गावातील सरपंच अथवा अन्य जबाबदार माहितगार व्यक्तिंशी संपर्क साधून केलेली आहे. हे शेतकरी निवडताना ते सर्वसाधारण व प्रातीनिधिक राहतील याची काळजी घेण्यात आली आहे. मोठे बागायतदार किंवा बक्षिस मिळविलेले शेतकरी सदर पाहणीसाठी विचारात घेतलेले नाहीत.

१.४ पाहणीकरीता वापरलेले माहिती पत्रक - सदर पाहणी करीता एकाच पत्रकाचा वापर करण्यात आलेला आहे. पत्रकातील चौकांचा चौकनिहाय तपशील पुढील प्रमाणे असून परीशिष्ट १ मध्ये पत्रकाचा नमुना दिला आहे.

अ) चौक १ - या चौकात प्रत्येक जिल्ह्यातील निवडलेल्या तालुक्यातील निवडलेले गाव, निवडलेले गौण पीक, निवडलेल्या शेतकऱ्याचे नाव व त्याच्या कौटुंबिक बाबींची माहिती इत्यादींचा समावेश आहे.

ब) चौक २ अ - निवडलेल्या कुटुंबाच्या जमीन धारणेसंबंधी माहिती सदर चौकात घेतलेली आहे.

क) चौक २ ब - शेतकऱ्याने घेतलेल्या / निवडलेल्या पिकांसंबंधीची माहिती व त्याचबरोबर सर्व पिकांसंबंधीची माहिती या चौकाद्वारे मिळते.

ड) चौक ३ - निवडलेल्या पिकाबाबतच्या कृषीनिवीष्ठेसंबंधीची माहिती या चौकाद्वारे मिळते.

ई) चौक ४ अ - निवडलेल्या पिकाचे उत्पादन व उपउत्पादनाच्या तपशीलासंबंधीची माहिती घेण्यासाठी या चौकाचा वापर केला आहे.

फ) चौक ४ ब - सदर चौकात उत्पादनाच्या विनियोगासंबंधीची माहिती घेतलेली आहे.

भ) चौक ५ - निवडलेल्या पिकासंबंधीच्या माहितीचा गोषवारा दर्शविणारा हा चौक आहे.

१.५ पाहणीचे क्षेत्रकाम - सदर पाहणीचे क्षेत्रकाम १५.१२.१९९२ ते ३१.०३.१९९३ पर्यंत पूर्ण करण्यात आले. माहितीची गुणवत्ता उत्तम राहावी याकरीता पाहणीसाठी वापरलेल्या पत्रकांतील चौकवार माहिती कशी घ्यावी याबाबत संबंधित क्षेत्रकर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले होते. तसेच कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही याकरीता क्षेत्रकामाची प्रत्यक्ष निरिक्षणे घेऊन शंका निरसन केल्या.

१.६ जिल्हा स्तरावर गोळा केलेल्या माहितीचे गौण पिकनिहाय निष्कर्ष प्रकरण-२ मध्ये दिले असून प्रकरण-३ मध्ये सारांश देण्यात आला आहे. अहवालाचा इंग्रजी भाषेतील गोषवारा परीशिष्ट २ मध्ये दिला आहे.

********

# प्रकरण - २ पाहणीचे निष्कर्ष

२.१ पाहणीकरीता जास्तीत जास्त क्षेत्रात घेतलेल्या गौण पिकांचा तपशील राज्य उत्पन्न शाखेकडे ऋतू व पीक अहवाल १९८१-८२ मधील उपलब्ध असलेली माहिती विचारात घेऊन तयार करण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यातून दोन प्रमुख गौण पिकांची निवड करण्यासाठी प्रथमतः जिल्हानिहाय घेतलेली सर्व गौण पिके विचारात घेतली. याप्रमाणे पिकांच्या निवडीकरीता विचारात घेतलेल्या गौण पिकांचा जिल्हानिहाय तपशील तक्ता क्र.२.१ मध्ये दिला आहे.

तक्ता क्रमांक / Table No.2.1

गौण पिकांच्या निवडीकरीता विचारात घेतलेली जिल्हानिहाय प्रमुख गौण पिके
Districtwise list of main minor crops considered for selection of Minor Crops

| अ. क्र.<br>Sr. No. | जिल्हा<br>District | निवडीकरिता विचारात घेतलेली गौण पिके<br>Minor crops considered for selection |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | ठाणे<br>Thane | वांगी, कोबी, मुळा<br>Brinjal, Cabbage, Radish |
| 2 | रायगड<br>Raigad | टोमॅटो, वांगी, खरबूज<br>Tomato, Brinjal, Musk Melon |
| 3 | रत्नागिरी<br>Ratnagiri | वांगी, मुळा<br>Brinjal, Radish |
| 4 | सिंधुदुर्ग<br>Sindhudurg | मुळा, वरी, कळीथ<br>Radish, Vari, Kulith |
| 5 | नाशिक<br>Nasik | टोमॅटो, कोबी, वांगी, फ्लॉवर<br>Tomato, Cabbage, Brinjal, Cauli flower |
| 6 | धुळे<br>Dhule | लसूण, भेंडी, वांगी<br>Garlic, Lady's Finger, Brinjal |
| 7 | जळगाव<br>Jalgaon | कोथिंबीर, टोमॅटो, वांगी<br>Coriander, Tomato, Brinjal |
| 8 | अहमदनगर<br>Ahmednagar | टोमॅटो, वांगी, गाजर<br>Tomato, Brinjal, Carrot |
| 9 | पुणे<br>Pune | भेंडी, टोमॅटो, लसूण<br>Lady's finger, Tomato, Garlic |
| 10 | सातारा<br>Satara | कोथिंबीर, वांगी, टोमॅटो, गाजर<br>Coriander, Brinjal, Tomato, Carrot |
| 11 | सांगली<br>Sangli | वांगी, गाजर, टोमॅटो<br>Brinjal, Carrot, Tomato |
| 12 | सोलापूर<br>Solapur | वांगी, गाजर, टोमॅटो<br>Brinjal, Carrot, Tomato |
| 13 | कोल्हापूर<br>Kolhapur | वांगी, फ्लॉवर, लसूण<br>Brinjal, Cauli flower, Garlic |
| 14 | औरंगाबाद<br>Aurangabad | लसूण, वांगी, मेथी<br>Garlic, Brinjal, Methi |
| 15 | जालना<br>Jalna | वांगी, कोबी, मेथी<br>Brinjal, Cabbage, Methi |

| अ. क्र. Sr. No. (1) | जिल्हा District (2) | निवडीकरिता विचारात घेतलेली गौण पिके Minor crops considered for selection (3) |
|---|---|---|
| 16 | परभणी<br>Parbhani | सोयाबीन, कोथींबीर, लसूण, टोमॅटो<br>Soyabean, Coriander, Garlic, Tomato |
| 17 | नांदेड<br>Nanded | कोथिंबीर, भेंडी, टोमॅटो, कोबी<br>Coriander, Lady's finger, Tomato, Cabbage |
| 18 | बीड<br>Beed | कोथिंबीर, भेंडी, कोबी, टोमॅटो<br>Coriander, Lady's finger, Cabbage, Tomato |
| 19 | उस्मानाबाद<br>Osmanabad | सोयाबीन, कोथिंबीर, लसूण<br>Soyabean, Coriander, Garlic |
| 20 | लातूर<br>Latur | कोथिंबीर, सोयाबीन, मेथी, कोबी<br>Coriander, Soyabean, Methi, Cabbage |
| 21 | बुलढाणा<br>Buldhana | लसूण, वांगी, भेंडी<br>Garlic, Brinjal, Lady's finger |
| 22 | अकोला<br>Akola | सोयाबीन, कोबी, वांगी<br>Soyabean, Cabbage, Tomato |
| 23 | अमरावती<br>Amravati | सोयाबीन, भेंडी, टोमॅटो<br>Soyabean, Lady's finger, Tomato |
| 24 | यवतमाळ<br>Yavatmal | वांगी, टोमॅटो, कोथिंबीर<br>Brinjal, Tomato, Coriander |
| 25 | वर्धा<br>Wardha | वांगी, टोमॅटो, भेंडी<br>Brinjal, Tomato, Lady's finger |
| 26 | नागपूर<br>Nagpur | कोथिंबीर, वांगी, टोमॅटो, कोबी<br>Coriander, Brinjal, Tomato, Cabbage |
| 27 | भंडारा<br>Bhandara | वांगी, भेंडी, टोमॅटो, कोथिंबीर<br>Brinjal, Lady's finger, Tomato, Coriander |
| 28 | चंद्रपूर<br>Chandrapur | वांगी, भेंडी, टोमॅटो, कोथिंबीर<br>Brinjal, Lady's finger, Tomato, Coriander |
| 29 | गडचिरोली<br>Gadchiroli | वांगी, कोथिंबीर<br>Brinjal, Coriander |

२.२ पाहणीकरीता प्रमुख दोन गौण पिकांची निवड करण्यासाठी तक्ता क्र.२.१ मधील माहितीनुसार २१ जिल्ह्यात वांगी, ८ जिल्ह्यात कोबी, ३ जिल्ह्यात मुळा, १८ जिल्ह्यात टोमॅटो, ७ जिल्ह्यात लसूण, ८ जिल्ह्यात भेंडी, १२ जिल्ह्यात कोथिंबीर, ५ जिल्ह्यात सोयाबीन, ४ जिल्ह्यात गाजर, ३ जिल्ह्यात मेथी, २ जिल्ह्यात फ्लॉवर तर वरी व कुळीथ प्रत्येकी एकाच जिल्ह्यात याप्रमाणे जास्तीत जास्त क्षेत्रात गौण पिके घेतलेली आहेत असे आढळले.

२.३ पाहणी करीता दोन प्रमुख गौण पिके निवडण्यासाठी तक्ता क्र.२.१ मधील पिकांचाच विचार करण्यात आला. त्याप्रमाणे पिकांखालील जिल्हानिहाय क्षेत्र लक्षात घेऊन त्यातील जास्तीत जास्त क्षेत्र असलेली पिके निवडण्यात आली असून सदर निवडलेल्या गौण पिकांचा जिल्हानिहाय तपशील तक्ता क्र.२.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक / Table No.2.2

पाहणीकरीता निवडलेल्या गौण पिकांचा जिल्हावार तपशील
Districtwise details of minor crops selected for survey

| अ. क्र.<br>Sr. No. | जिल्हा<br>District | निवडलेली गौण पिके<br>Selected minor crops | |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | |
| 1 | ठाणे<br>Thane | वांगी<br>Brinjal | मुळा<br>Radish |
| 2 | रायगड<br>Raigad | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 3 | रत्नागिरी<br>Ratnagiri | वांगी<br>Brinjal | मुळा<br>Radish |
| 4 | सिंधुदुर्ग<br>Sindhudurg | वरी<br>Vari | कुळीथ<br>Kulith |
| 5 | नाशिक<br>Nasik | टोमॅटो<br>Tomato | कोबी<br>Cabbage |
| 6 | धुळे<br>Dhule | वांगी<br>Brinjal | लसूण<br>Garlic |
| 7 | जळगाव<br>Jalgaon | वांगी<br>Brinjal | कोथिंबीर<br>Coriander |
| 8 | अहमदनगर<br>Ahmednagar | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 9 | पुणे<br>Pune | भेंडी<br>Lady's finger | टोमॅटो<br>Tomato |
| 10 | सातारा<br>Satara | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 11 | सांगली<br>Sangli | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 12 | सोलापूर<br>Solapur | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 13 | कोल्हापूर<br>Kolhapur | वांगी<br>Brinjal | फ्लॉवर<br>Cauli flower |
| 14 | औरंगाबाद<br>Aurangabad | वांगी<br>Brinjal | मेथी<br>Methi |
| 15 | जालना<br>Jalna | वांगी<br>Brinjal | कोबी<br>Cabbage |
| 16 | परभणी<br>Parbhani | सोयाबीन<br>Soyabean | लसूण<br>Garlic |
| 17 | नांदेड<br>Nanded | कोथिंबीर<br>Coriander | टोमॅटो<br>Tomato |
| 18 | बीड<br>Beed | कोथिंबीर<br>Coriander | टोमॅटो<br>Tomato |
| 19 | उस्मानाबाद<br>Osmanabad | सोयाबीन<br>Soyabean | लसूण<br>Garlic |

| अ. क्र. Sr. No. (1) | जिल्हा District (2) | निवडलेली गौण पिके Selected minor crops (3) | |
|---|---|---|---|
| 20 | लातूर<br>Latur | मेथी<br>Methi | कोबी<br>Cabbage |
| 21 | बुलढाणा<br>Buldhana | सोयाबीन<br>Soyabean | टोमॅटो<br>Tomato |
| 22 | अकोला<br>Akola | सोयाबीन<br>Soyabean | कोबी<br>Cabbage |
| 23 | अमरावती<br>Amravati | वांगी<br>Brinjal | भेंडी<br>Lady's finger |
| 24 | यवतमाळ<br>Yavatmal | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 25 | वर्धा<br>Wardha | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 26 | नागपूर<br>Nagpur | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 27 | भंडारा<br>Bhandara | वांगी<br>Brinjal | कोथिंबीर<br>Coriander |
| 28 | चंद्रपूर<br>Chandrapur | वांगी<br>Brinjal | टोमॅटो<br>Tomato |
| 29 | गडचिरोली<br>Gadchiroli | वांगी<br>Brinjal | कोथिंबीर<br>Coriander |

२.४ जिल्हानिहाय निवडलेल्या गौण पिकांचे निरीक्षण करता असे दिसते की, राज्याच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये प्राधान्याने वांगी (१९) व त्यानंतर टोमॅटो (१४) या दोन गौण पिकांखालील क्षेत्र जास्त प्रमाणात होते. कोथिंबीर, सोयाबीन, कोबी, लसूण, भेंडी, मुळा, मेथी, फ्लॉवर, वरी, कुळीथ याप्रमाणे गौण पिकांचा अनुक्रम आहे. वरी व कुळीथ ही गौण पिके फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातच घेतल्याचे आढळते. विभागवार विचार करता कोकण, पुणे, नाशिक व नागपूर या विभागात प्राधान्याने वांगी व त्यानंतर टोमॅटो या क्रमाने गौण पिके घेतलेली आहेत. सोयाबीन हे अमरावती व औरंगाबाद विभागातच घेतल्याचे आढळते.

२.५ सदर पाहणीकरिता प्रत्येक जिल्ह्यातून १०० शेतकऱ्यांची निवड करावयाची होती. तथापि कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातून काही अपरिहार्य कारणास्तव अनुक्रमे ८५ व ८३ शेतकरी निवडले असून लातूर जिल्ह्यात निवडलेल्या दोन्ही पिकांचे जास्तीत जास्त क्षेत्र असलेले ५० शेतकरी मिळाल्याने १०० ऐवजी ५० शेतकऱ्यांचीच निवड करण्यात आली. याप्रमाणे राज्यातून एकूण २,८१८ शेतकरी सदर पाहणीसाठी निवडले असून त्यांचा जिल्हावार तपशील तक्ता क्र.२.३ मध्ये दिल्याप्रमाणे आहे.